PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sundar Majhe Ghar
Year: 2009

Song: Urat Dhaddhad Surat Hote
Lyricist: Guru Thakur

उरात धडधड सुरात होते
उरात धडधड सुरात होते
श्वास चुकवितो ताल परि
कशी सावरू तोल कळेना
पाऊल पडते अधांतरी
पाऊल पडते अधांतरी

कशी मोहिनी केली कोणी
मलाच माझे ना कळते
मनात माझ्या फुलून अलगद
फूल प्रीतीचे दरवळते
एक अनावर ओढ फुलविते
गोड शिरशिरी तनूवरी
कशी सावरू तोल कळेना
पाऊल पडते अधांतरी
पाऊल पडते अधांतरी

आठवणींच्या हिंदोळ्यावर
होऊनी हळवी मी झुलते
आठवणींच्या हिंदोळ्यावर
होऊनी हळवी मी झुलते
कणाकणांतून इथल्या
वेडा जीव गुंतला सोडवते
आनंदाचा घन पाझरतो
गहिवर दाटून येई उरी
कशी सावरू तोल कळेना
पाऊल पडते अधांतरी
पाऊल पडते अधांतरी

स्वप्न म्हणू की भास
कळेना आज मी बावरते
प्रीत जणू रेखीत
तुझ्या मिठीत मी मोहरते
हात दे रे हातात
राहू दे साथ जन्मांतरी
जन्मांतरी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*